पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९३ /२०२३ दि. 03 /०५/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी, कळवा** वाहतूक उपविभागाचे हद्दीत ठाणे महानगरपालिका मार्फत भुयारी गटार योजना टप्पा क्र. २ अंतर्गत खारेगाव येथील मलउदंचन केंद्र क्र. ४ खारेगाव मलप्रक्रिया केंद्र ते साई समर्थ को.ऑप.हौ.सोसायटी परिसरात मलउर्ध्ववाहिनी टाकण्यात येणार आहे. त्याकरीता बाळकुम प्रभाग समिती अंतर्गत मुंबई–आग्रा हायवे नाशिक – मुंबई वाहिनीलगत खारेगाव कट येथील खारेगाव अंडरपास, खारेगाव बाजुला उतरणारे व चढणारे दोन्ही रॅम्पच्या ठिकाणी ६० मीटर खोदकाम करून टप्प्याटप्प्याने २ मीटर रूंद व ३ मीटर खोल चर काढण्यात येणार आहे. सदर काम सुरू असताना १) खारेगाव अंडरपास, २) खारेगाव बाजुला उतरणारा रस्ता, ३) खारेगाव येथून साकेत ब्रिज बाजूकडे जाणारा रस्ता असे तीनही रस्ते सदर काम पूर्ण होईपर्यंत वाहतुकीकरीता पूर्णपणे बंद राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) नाशिक मुंबई रोडने खारेगाव कट येथून डावीकडे वळण घेवून खारेगाव कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **खारेगाव कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदर वाहने खारेगाव टोलनाका येथून डावीकडे वळण घेवून गॅमन – पारसिक सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.
ब) सदर वाहने सरळ पुढे साकेत कट येथून डावीकडे वळण घेवून राबोडी क्रॉस नवीन कळवा ब्रिजचा वापर करून कळवा नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) खारेगाव येथून खारेगाव कट मार्गे ठाणे कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **खारेगाव कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने खारेगाव कट येथून वळण घेवून ६० फीट रोड – दत्तवाडी जुना मुंबई पुणे रोड – कळवा नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) मुंबई नाशिक रोड खारेगाव कट येथून डावीकडे वळण घेवून खारेगाव कडे अंडरपासने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **खारेगाव कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने खारेगाव कट येथून सरळ पुढे खारेगाव टोलनाका येथून डावीकडे वळण घेवून गॅमन – पारसिक सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. ०३/०५/२०२४ ते दि. ३१/०५/२०२४ रोजीपावेतो २४ तास अंमलात राहील.

सदरची वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने, व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—१, ५, वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :—**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— संबंधित सपोआ वाहतूक विभाग, पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.